## प्रेस नोट ता. १८/०४/२०१९

**हडपसर पोलीसांकडून घरफोडी चोरी व वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक व अटकेतील आरोपीकडून ४,६०,०००/- रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने व ०२ फोर व्हिलर व ०२ दुचाकी असे एकुण ०४ वाहने जप्त**

लोकसभा निवडणुकीच्या प्रार्श्वभुमीवर पुणे शहरातील वाहन चोरी, जबरी चोरी व घरफोडी चोरीच्या गुन्हयास प्रतिबंध करुन, चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनेनुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीतील चोरीच्या गुन्हयास आळा बसविण्याकरीता विशेष मोहिम राबविण्यात आली आहे.

हडपसर पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी हे जबरी चोरी, घरफोडी चोरी, वाहन चोरी चोरीच्या गुन्हयांचा तपास करीत असताना पोलीस नाईक २८०० प्रताप गायकवाड व पो. शि. ७३१७ नितीन मुंढे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे हडपसर गाव येथे सापळा लावुन आरोपी नामे पप्पुसिंग घागासिंग टाक वय २३ वर्षे रा.स.नं.८६, बिराजदार नगर, गल्ली् नं.३ हडपसर पुणे यास पकडले त्यावेळी त्याचे ताब्यात हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३३२/२०१९ भादविक ४५४, ३८० या गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्याचे दागिने मिळुन आले. इसम नामे पप्पुसिंग घागासिंग टाक यास वरील नमूद गुन्हयात दिनांक १५/०४/२०१९ रोजी २०.०० वाजता अटक करण्यात आली आहे. अटक मुदतीत त्याची पोलीस कस्टडीची रिमांड घेवुन त्याचेकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने हडपसर पोलीस स्टेशनकडील ०२ फोरव्हीलर, ०२ टू व्हिलर गाडया व दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले सोन्या चांदीचे दागिने मेमोरंडम पंचनाम्याने काढुन दिल्याने ते गुन्हयाचे पुरावेकामी जप्त करुन ताब्यात घेतले आहे. अटक आरोपी हा पोलीस कस्टडीत असुन त्याचेकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

अटक आरोपींकडुन हडपसर पोलीस स्टेशन कडील ०४ वाहन चोरीचे गुन्हे व ०१ घरफोडी चोरीचा गुन्हा असे एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणुन त्याचेकडून **एकुण ४,६०,०००/- रुपये किंमतीचा मूददेमाल २१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, १४४ ग्रॅम चांदीचे दागिने २ फोर व्हिलर व २ -टू व्हिलर गाडया असा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण,प्रसाद लोणारे, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो. हवा. ५५६२ राजेश नवले, पो. ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. ५८९४ प्रमोद टिळेकर, पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो. ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. ना. ५७९१ राजु वेगरे, पो. ना. ५८५३ गणेश दळवी, पो. शि. ७३१७ नितीन मुंढे, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो. शि.७६८४ शंशिकांत नाळे यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**हडपसर पोलीस स्टेशन, पुणे**